# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८

दूरध्वनी -२३०२३९००/ २३०७५५३९ Website : www.msrtc.gov.in फॅक्स - २३०८६३५२


## प्रसिध्दी पत्रक क्र. ५

## - परिवहन मंत्र्यांची एस.टी. मुख्यालयास भेट -

**मुंबई, शुक्रवार, दिनांक २९ जानेवारी, २०१०**

मा. परिवहनमंत्री ना. श्री. राधाकृष्ण विखे - पाटील यांनी नुकतीच एस. टी. च्या मध्यवर्ती कार्यालयास भेट दिली. एस. टी. चे अध्यक्ष मा. श्री. सुधाकरपंत परिचारक, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर, मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्री. मोहन राठोड व इतर उच्च अधिका-यांसमवेत घेतलेल्या बैठकीत त्यांनी प्रवाशांना अधिकाधिक चांगली सेवा देण्याच्या दृष्टीने सखोल चर्चा करुन खालीलप्रमाणे महत्त्वाच्या सूचना केल्या :-

- राज्यातील तीर्थक्षेत्र व पर्यटन केंद्रासाठी पॅकेज टूरची शक्यता पडताळून पाहावी.
- तालुका व जिल्हयाचे ठिकाण जोडणा-या मार्गावर विना - थांबा जलद सेवा सुरु कराव्यात.
- जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणाहून मुंबईकडे येणा-या बसेसमध्ये संबंधित जिल्हयाची माहिती देणारी छायाचित्रे / माहिती प्रदर्शित करावी.
- बसेसच्या टपावर असलेल्या लोखंडी ऐवजी फायबरच्या कॅरीयरची शक्यता अजमावून पाहावी.
- शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थांसाठी गरजेनुसार बसेसची व्यवस्था करावी.
- प्रत्येक बसमध्ये प्रथमोपचार पेटी, बॅटरी आणि रस्त्यात बिघडलेली बस दुरुस्त करण्यासाठी लागणारी किमान साधन सामुग्री उपलब्ध करुन देणे.

बैठकीपूवी मा. मंत्रीमहोदयांनी एस. टी. चे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दीपक कपूर यांचे समवेत मुंबई सेंट्रल बसस्थानक, आगार, उभ्या असलेल्या बसेस व चालक / वाहक विश्रांती कक्षाची पाहाणी केली. सदर पाहाणीत आढळून आलेल्या त्रुटींबाबत व असलेल्या सुविधेत सुधारणा करण्यावर त्यांनी सर्वाधिक भर देवून अत्यंत मौलिक सूचना केल्या. यामध्ये चालक / वाहक विश्रांतीगृहात आरामदायी व्यवस्था व स्वच्छता, चालक / वाहकांची वर्षांतून एकदा संपूर्ण वैद्यकीय तपासणी करणे इ. चा समावेश होता.

**सहा. जनसंपर्क अधिकारी**